म. ग्रं. सं.
विषय
दा. क.

चरित्र

म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक भागवत रा० स | सन |
|---|---|---|
| चरित्र | | १८८९ |
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव रत्नाकरपंत अप्पा अहिल्याबाई शिंदेजी | |
| ९२८ | | |

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
वा. नं. २५

सिक पुरुषांची चरित्रमाला.

# आप्पा, अहल्याबाई होळकरीण व सिधोजी निपाणकर.

चरित्रें लिहिणार
राजाराम रामकृष्ण भागवत.

मुंबई.
फ्यामिली प्रिंटिंग प्रेस.

श्रावण शुक्ल १ शालि० शके १८११.
( इसवी सन १८८९. )

किंमत दीड आणा, टपालासहित दोन आणे.

# रत्नाकरपंत आप्पा.

## तात्पर्य.

१—अगदीं पहिलें इतिवृत्त. २—अळसाची लढाई. ३—रत्नाकरपंतास ‘राजाज्ञ’ हा किताब मिळतो. ४—[illegible]कुंडीची लढाई. ५—कोल्हापुरास वेढा पडतो. ६—कोल्हापुरचा वेढा उठतो. ७—रत्नाकरपंताच्या स्वामिभक्तीचा व देशभक्तीचा निष्कामपणा. ८—रत्नाकरपंताची कुळदेवतेच्या ठिकाणीं ऐकान्तिक निष्ठा. ९—रत्नाकरपंताच्या मनाचा धीरपणा व लष्करी हुशारी. १०—रत्नाकरपंताचा उतार वयांत कुळदेवतेच्या संनिध वास व त्याच्या इतिवृत्तावरून कांहीं तुरळक विचार.

## १—अगदीं पहिलें इतिवृत्त.

रत्नाकरपंत हा ब्राह्मण पहिल्यानें कोल्हापुरकरांचे पदरीं कारकुनाचें काम करून आपली गुजराण करीत होता. अस्सल हिरा असतो, त्याचा प्रकाश कोठेंही लपत नाहीं. हा ब्राह्मण केवळ आपल्या हुशारीनें हळू हळू पोतनीस होऊन, सर्व फौजेवर मुख्य कामगार झाला. पुढें कांहीं दिवसांनीं मुख्य कारभाऱ्याचा मोठ्या जोखिमाचा हुद्दा रत्नाकरपंतास मिळाला.

## २—अळसाची लढाई.

रत्नाकरपंतानें कारभार उत्तम रीतीनें चालविला, इतकेंच नाहीं, तर कित्येक लढायाहि मारून आपलें

गांव गाजविलें. दहा हजार फौज बरोबर देऊन परशुराम भाऊनें आपले चिरंजीव रामचंद्रपंत यांस कोल्हापुरकरांच्या मुलखास उपद्रव करण्यास पाठविलें होतें. कोल्हापुरकरांची व पटवर्धनाची जी लढाई झाली, तीस अळल्याची लढाई ह्मणतात. अळल्याच्या लढाईत पुरा मोड होऊन, रामचंद्रपंत पळून गेले. पण रत्नाकरपंतानें रामचंद्रपंताचा पाठलाग केला व अखेरीस त्यास कैद करून आणिलें. रामचंद्रपंतास बऱ्याच जखमा लागल्या होत्या. रामचंद्रपंतास पकडलें, तेंव्हां त्याच्याबरोबरच्या बऱ्याच तोफाही रत्नाकरपंतानें पाडाव करून आणिल्या.

## २–रत्नाकरपंतास "राजाज्ञ" हा किताब मिळतो.

पुढें पेशवे सरकारचा ऐवज खाऊन मामलतदार जमखिंडीचें ठाणें बळकावून बसला होता, त्यास जेरीस आणून ठाणें आपण पाठविलेल्या कारकुनाच्या जिम्मेस करावें, अशी नाना फडणिसानें कोल्हापुरकरांस विनंती केली. नानाफडणीस हा या काळीं पेशव्यांचा मुख्य कारभारी होता. पेशव्यांचें व कोल्हापुरकरांचें जरी सख्य ह्मणून कधींच नव्हतें, तरी या काळचे कोल्हापुरचे शिवाजी महाराज मोठ्या उदार दिलाचे होते. शत्रूवरही आपण उपकार करावा, असा निश्चय करून, महाराजांनीं वरील कामगिरी रत्नाकरपंतास सांगितली.

पुढें रत्नाकरपंतानें ती नीट बजाविली, ह्मणून ‘ राजाज्ञ ’ असा किताब महाराजांनीं त्यास दिला.

हा किताब मिळाल्यानंतर रत्नाकरपंतास महाराजांनीं कर्नाटकांत रवाना केलें. तिकडील पुष्कळ ठाणीं रत्नाकरपंतांनीं घेतली, व त्यांच्यावर कोल्हापुरकरांचा ञावटा डोलूं लागला.

## ४–पट्टणकुंडीची लढाई.

पुढें पट्टणकुंडीची लढाई झाली, तींत रत्नाकरपंत हजर होतेच. ही लढाई परशुराम भाऊ पटवर्धन व कोल्हापुरकर शिवाजी महाराज या दोहोंमध्यें झाली.

कोल्हापुरकरांनीं आपल्या फौजेच्या चार टोळ्या केल्या. दक्षिण बाजूच्या टोळींत घोरपडे सेनापति, घाटगे व गायकवाड हे तीन मोठे सरदार होते. पश्चिमेकडील टोळींत प्रीतिराव चव्हाण नांवाचा शूर सरदार असून, याच टोळींत खांसा महाराज होते. उत्तर बाजूस नुक्तेच मुख्य कारभारी झालेले रत्नाकरपंत आप्पा होते. पूर्वेस पांढरे नांवाचे सरदार होते, त्यांचें पतक व एकांडे लोक होते. पूर्वेकडची टोळी आघाडीस होती. कोल्हापुरकरांनीं जो व्यूह रचिला होता, तो खालीं दर्शविल्याप्रमाणें होता—

पश्चिमेस—महाराज व प्रीतिराव चव्हाण.

उत्तरेस–रत्नाकरपंत आप्पा.

दक्षिणेस–घोरपडे, घाटगे, व गायकवाड.

पूर्वेस—पांढरे व एकांडे ( ही आघाडीची टोळी.)

"रुप्याच्या हौद्याचे व निशाणाचे हत्ती प्रत्येक टोळींतील मुख्य सरदारांपाशीं उभे होते. सर्व फौजेच्या आघाडीस जेजाला व तोफा लादून शृंगारलेले उंट उभे होते. महाराजांकडील खासबारदार लोकांनीं लोखंडी चिलखतें व शिरस्त्राणें धारण केलीं होतीं. भालेवाल्या व तरवारवाल्या स्वारांच्या टोळ्या पायदळांतून मधून मधून जिकडे तिकडे उभ्या केल्या होत्या. याप्रमाणें घोर संग्रामाची तयारी करून कोल्हापुरकर शत्रूच्या तोंडावर निघाले."

पटवर्धनांचा तोफखाना पहिल्यानें पुढें आला, व लागलीच उत्तरेकडच्या टोळीवर मारागिरी सुरू झाली. तेव्हां "पूर्व बाजूस पांढऱ्यांचें पतक होतें तें पुढें सरसावलें, व लढाईस आरंभ झाला. पटवर्धनांकडून सपाट्यासरशीं तोफांचा भडिमार सुरू केला, त्यामुळें महाराजांकडील लोकांची एकच धांदल उडून गेली. निशाणाच्या हत्तीवर चढून पटवर्धनांच्या लोकांनीं पांढऱ्यांच्या पतकास घेरलें. पांढऱ्यांकडील पांच सात सरदार ठार झाले. तेव्हां बाकीच्या लोकांनीं कच खाल्ला. हें वर्तमान महाराजांकडे येतांच प्रीतिराव चव्हाण यांनीं विनंती केली, कीं या वेळीं महाराजांनीं खंबिरी करून पुढें व्हावें, समय हाच आहे. महाराजांनीं हिंमत धरली असतां लोकांस

दुप्पट दम व वीरश्री येईल. येणेंकरून महाराजाचा हमेश वर्णन करण्याजोगा लौकिक होऊन, शत्रूचा क्षय होईल. हें ऐकून महाराजांसही वीरश्री चढली, व ते सिद्ध झाले. त्यांनीं रत्नाकरपंतांकडेस पहातांच तेही जोहार करून, एक दोन पतकें व पागा घेऊन, महाराजांबरोबर निघाले. मग काय विचारतां? खासे निघतांच, सर्व सरदार पुढें सरले. स्फुरण चढून, आपली हिंमत व कर्तबगारी दाखविण्याचा हाच प्रसंग आहे असें मनांत आणून, फौजेंतील लोकांनीं शत्रूवर चढाई केली. प्रथम पांढरे यांजकडील निशाणाचा हत्ती शत्रूंनीं घेतला होता, त्याठिकाणीं लगट करून, मोठ्या आवेशानें कोल्हापुरकर शत्रूच्या फौजेवर जाऊन पडले. असा हल्ला आल्यास बचाव करण्याची पटवर्धनांची तयारी नव्हती. महाराजांच्या लोकांनीं निशाणाचा हत्ती सोडवून घेऊन, शत्रूच्या फौजेचा मोड केला. इतक्यांत दक्षिणेकडल्या टोळींतील सेनापति, घाटगे, गायकवाड वगैरे सरदारांनीं शत्रूच्या गोटावर हल्ला करून गोट लुटला, व शत्रूकडील लोकांची कत्तल करण्यास आरंभ केला. इतकी दुर्दशा एका घटिकेंत झाली. परशुराम भाऊ बुदवळें खेळत होते. ते बुदवळांतील लटकी लढाई टाकून, खऱ्या लढाईस डेऱ्यांतून बाहेर आले. लगेच घोड्यावर स्वार होऊन, गोटांतील फौजेची थावरा-

थावर करून, फौज जमविली, आणि लढाई देण्यास निघाले. महाराजांकडील सेनापति, घाटगे, गायकवाड हे जवळ तयारच होते, त्यांनीं जलदी केली; आणि आपल्याकडील पागेच्या लोकांस बेधडक पुढें सारून, परशुराम भाऊच्या तोंडावर चालून गेले. लढाई मोठ्या निकरानें झाली. पटवर्धनांच्या लोकांकडील लढाईची शिस्त अगोदरपासूनच बिघडलेली होती, त्यामुळें त्यांचा जम बसेना. खुद्द महाराज आपल्या सरदारांस व लोकांस हिंमत देण्यास समीप असल्यानें, जो कोल्हापुरच्या लोकांस आवेश आला होता, त्यापुढें पटवर्धनांचें कांहीं चालेना. अखेर परशुराम भाऊंस लढाईत भारी जखमा लागून, ते घायाळ झाले, व त्यांच्या फौजेचा अगदीं मोड झाला. वडील जखमी होऊन घायाळ झाल्याचें वर्तमान समजतांच, परशुराम भाऊंचे चिरंजीव रामचंद्रपंत लश्कर सोडून पळून जमखिंडीकडेस गेले "!!!

याप्रमाणें पट्टणकुडीची लढाई झाली तींत कोल्हापुरकरांचा पूर्ण जय झाला, व पटवर्धनांच्या फौजेचा पुरी वाताहत झाली.

परशुराम भाऊ जरी जातीचा ब्राह्मण होता, तरी कांहीं सामान्य योद्धा नव्हता. आपल्या महाराष्ट्र मंडळांतील ब्राह्मण हिंदुस्थानांतील इतर ब्राह्मणांसारखे नव्हत. सगळ्या पटवर्धनांच्या घराण्यांत परशुराम भाऊंसारखा योद्धा झाला नाहीं.

महाराष्ट्र मंडळांतील क्षत्रियांनीं व ब्राह्मणांनीं तलवार पूर्वीं कशी गाजविली, तें वरील लढाईवरून नीट लक्षांत येण्यासारखें आहे. भीष्मासारखे व द्रोणासारखे रणवीर जे पुराणांत ऐकण्यांत येतात, ते जर या काळीं जिवंत असते, तर आपल्या महाराष्ट्र मंडळांतील क्षत्रियांपुढें व ब्राह्मणांपुढें त्यांस निःसंशय वांकावें लागतें. असो.

रामचंद्रपंताचा पाठलाग रत्नाकरपंतांनीं बरेच कोस केला. पण यावेळीं रामचंद्रपंत रत्नाकरपंताच्या हातून निसटला.

## ९—कोल्हापुरास वेढा पडतो.

पुढें पुण्याच्या दर्बारीं भलभलतेंच सांगून शिंद्याचीं गोऱ्या कामगारांनीं शिकविलेलीं पलटणें बरोबर घेतला व कुचावर कूच करीत कोल्हापुरकरांस समूळ बुडविण्यासाठीं ह्मणून रामचंद्रपंत कोल्हापुराजवळ येऊन थडकला. पहिल्यानें लहानशी लढाई झाली, तींत कोल्हापुरकरांस हटावें लागलें, व त्यामुळें लौकरच कोल्हापुरास वेढा पडला.

अशा प्रसंगीं महाराजांनीं रत्नाकरपंतास सल्ला विचारिली. रत्नाकरपंत निःसीम स्वामिभक्त होता. आपल्या प्रभूच्या केंसासही धक्का लागूं नये, अशी व्यवस्था ठेवणें, हें तो आपलें पाहिलें कर्तव्य समजे. या वेळीं शिंद्याचीं पलटणें रामचंद्रपंताबरोबर आलीं होतीं;

इतकेंच नाहीं, तर दुसरीही पुष्काळ कुमक येत होती व यावयाची होती. ह्मणून प्रसंग मोठा अणीबाणीचा समजून, रत्नाकरपंतानें कोल्हापुर आपल्या सरदारांच्या स्वाधीन करून महाराजांस पन्हाळ्यावर जाण्याची सल्ला दिली. महाराजांचा रत्नाकरपंतावर पूर्ण भरंवसा होता; व हा जो महाराजांचा पूर्ण भरंवसा होता, तो निःसंशय अपात्रीं नव्हता. निघतांना रत्नाकरपंत व प्रीतिराव चव्हाण या उभयतांस "महाराजांनीं आज्ञा केली कीं 'प्राणा परतीं मेहेनत करून किल्ला रक्षण करावा; शत्रूच्या हातीं जाऊं देऊं नये.' तेव्हां उभयतांतीं उत्तर दिलें कीं 'आह्मीं सेवक जिवंत आहों तोंपर्यंत किल्ला शत्रूच्या हातांत जाणार नाहीं, ही प्रतिज्ञा समजावी.' असें बोलून हुजुरच्या चरणांवर मस्तक ठेविलें. त्या समयीं महाराज प्रीतिरावांस बोलले कीं 'रत्नाकरपंत व तुह्मीं गुरुबंधू आहांत; या उपरि कोणती आज्ञा होणेची?' असें बोलून आपल्या मस्तकावरील तिवट काढून प्रीतिरावांस दिलें व याची 'शरम राखावी' असें सांगितलें. 'हें सरकारी तिवट प्रासादिक आहे, याची मी नित्य पूजा करीन; जी पूर्वीं प्रतिज्ञा केली आहे, तींत किमपि अंतर करणार नाहीं, हें सरकारांनीं पक्कें समजावें.' असें प्रीतिरावांनीं ह्मणतांच स्वारी चालती झाली. परंतु इतक्यांत 'स्वारी जाते त्या पक्षीं आह्मीं कोणाचे ह्मणून लढावें' अशी विनंती करून ना-

यक्रवडी आडवे आले. तेव्हां घोळ पडून त्या दिवशीं स्वारीचें रहाणें झालें. दुसरे दिवशीं रत्नाकरपंत पदर पसरून बोलले, कीं 'अशा विकट प्रसंगीं सरकारास येथें रहाणें सुरक्षित नाहीं; यास्तव महाराज आहेत, व रत्नाकरपंत गेले, असें मनांत आणून सेवा करावी; अगोदर आमचा प्राण जाईल, मग तुमचें काय होणें तें होईल, ही खात्री बाळगावी.' अशी अनेक प्रकारें त्यांची समजूत घालून, स्वारीच्या जाण्यास अडथळा करूं नये, असें ठरविलें."

स्वामिभक्त असावे, तर रत्नाकरपंतासारखे असावे. प्रसंग पडल्यास पहिल्यानें स्वामीच्या देहाची काळजी, मग आपल्या देहाची. प्रसंगीं स्वामीचा विश्वासघात करून, आपला तळीराम गार करून घेणारे दिवाण व राजभृत्य धुळीच्या कणांप्रमाणें गल्लोगल्लीं असंख्य सांपडतील. रत्नाकरपंतासारखे हिरे मात्र कधीं कधीं चमकतात तेव्हां चमकतात.

"स्वारी गेल्यावर दुसरे दिवशीं रत्नाकरपंत यांनीं प्रीतिराव यांस विचारिलें, कीं 'जर तुह्मी लोकांचे खर्चाचा व किल्ल्याचा बंदोबस्त कराल, तर मला जी वेस सांभाळण्यास सांगाल ती सांभाळीन; किंवा जी दुसरी कामगिरी सांगाल, ती करीन.' तेव्हां प्रीतिरावांनीं सांगितलें कीं 'किल्ल्याचा व लोकांचा बंदोबस्त आपणच करावा, आमच्या हातून व्हावयाचा नाहीं.' याप्रमाणें

त्यांनीं केल्यावर रत्नाकरपंतांनीं साऱ्या वेशींवर सरदार नेमिले."

कित्येक कारभारी असतात, ते दुरभिमानी व सत्तेचे लोभी असतात. पण रत्नाकरपंतांचा हा निरभिमानीपणा व सत्तेच्या संबंधानें निर्लोभीपणा प्रत्येकानें लक्षांत ठेवण्यासारखा आहे. जे राजसेवक असतात, त्यांनीं रत्नाकरपंतांचें उदाहरण कधींही डोळ्यांपुढून जाऊं देतां कामां नये. जी प्रभूची किंवा देशाची सेवा करावयाची, ती निष्कामपणानें केली पाहिजे. देवास निष्काम भक्ति विशेष आवडते, सकाम भक्ति तितकी आवडत नाहीं. निष्काम भक्तावर संकट आलें, तर त्याचा भार आपोआप देवावर पडतो. प्रभूची किंवा देशाची निष्काम सेवा करणारा असतो, त्याच्यावर संकट आल्यास सगळा भार प्रभूवर किंवा देशावर पडतो; व ज्यांच्यावर भार पडतो, ते तो पडलेला भार राजीखुशीनें वहातात.

## ६—कोल्हापुरचा वेढा उठतो.

पुढें शत्रूची "कोल्हापुरच्या तटावर मारागिरी चालली. परंतु तट वीस हात उंच व सहापासून तो तेरा हात रुंद असून, मोठमोठ्या दगडांनीं मजबूत बांधलेला होता, व जागजागीं पंचेचाळीस बुरुज होते. आंत तटावर व बुरुजांवर चौक्या असून, गोलंदाज व बंदुकबारदारही मारागिरी करीत होते. शिवाय कोठें तट पडला कीं तेवढा लागलाच बांधून घेत असत. आंतील लोक उंच जागीं होतें, सवत्र त्यांच्या बंदुकींच्या मारागिरीपुढें शत्रूच्या लोकांस तटानजी-

क येण्यास सांपडत नसे. कांहीं दिवसांनीं तटानजीक मोर्चेबंदी जास्त करून, तोफांची मारागिरी अधिक करूं लागले. तेव्हां कांहीं दिवशीं किल्ला कांहीं जेरीस आला आहे, असें दिसल्यावरून किल्ल्यावर एकाएकीं छापा घालून, हल्ला करावा असें ठरवून, हल्याच्या दिवशीं अस्तमानपासून तोफांची मारागिरी सुरू केली; आणि चौथे प्रहरीं ह्मणजे पहांटेच्या प्रहर रात्रीस फुरसतीचा समय पाहून, किल्ल्याच्या कुसवास शिड्या लावून, हल्ला करण्यास पलटणाचे लोक चढूं लागले. तेव्हां चणेचोरटीच्या बुरुजावर बाजीराव कृष्ण रेणावीकर व [illegible] होते, त्यांनीं लोकांस चढतांना पुढें बंदुकांची मारागिरी चालविली. वेशीनजीकच्या बुरुजावरील खासबारदार लोकांनींही बंदुकीची मारागिरी चालविली. येणेंकरून शिड्यांवर चढून वर येण्याचें ज्यांनीं साहस केलें होतें, ते सर्व ठार झाले. इतक्यांत [illegible] दरवाज्यांतून तटावर आले, आणि मानकरी एकांडे लोक यांजकडून शिड्या खालीं ढकलून देवविल्या. एकच हरळी करून व सर्वांस हिंमत देवून, शत्रूच्या लोकांवर बंदुकांचा, पाषाणांचा व बाणांचा भडिमार करून अशी हुल्लड केली कीं तेणें करून शत्रूचा फार नाश झाला. पलटणीचे दोन तीन गोरे सरदार ठार पडले. पलटणीचे व इतर लोक मिळून सुमारें २७०० ठार झाले; व हजार दीड हजार लोक जखमी झाले. याप्रमाणें अवस्था झाल्यावर हल्ला करण्यास आलेले लोक मागें फिरून, गोळीचा मार चुकवून अंतरावर जाऊन

उभे राहिले. इतक्यांत सूर्योदय झाला. नंतर पल-टणांच्या लोकांपैकीं दोन चार असामी हत्यारें ठेवून रेणावीकरांकडे आले. तटावरील व बुरुजावरील गोळी बंद करण्याविषयीं रत्नाकरपंतांस विनंती करावी, ह्मणजे आह्मीं हत्यारें ठेवून मुडदे घेऊन जाऊं, असें ह्मणाले. तेव्हां रत्नाकरपंतांनीं गोळी बंद करण्यांस हुकुम देऊन मुडदे नेण्यास परवानगी दिली. त्यासमयीं पलटणचे लोक हत्यारें ठेवून मुडदे नेण्यास आले. त्यांस कोल्हापुरकर तटावरून व बुरुजांवरून पहात होते. त्यांनीं मुडदे नेऊन मूठमाती दिली. गोऱ्या सरदारांचीं थडगीं शहरानजीक अद्याप आहेत."

आपल्या नांवाजलेल्या पलटणाची अशी दुर्दशा झाली हें कळतांच, शिंद्यानें आपला हात काढून घेतला, व रामचंद्रपंतानें पोबारा केले. तेव्हां कोल्हापुराचा वेढा लौकरच उठला.

जसें कोल्हापुरची लोकवस्ती पुष्कळ वाढल्यामुळें पाणी पुरत नाहीं ही सबब सांगून बाबूराव केशवानें लाखो रुपये खर्चून बांधलेले मजबूत हौद साफ फोडून टाकण्याचें तसेंच हवा व उजेड पुरत नाहीं या सबबीनें चणेचोरटीच्या नामांकित बुरुजासह अशेप किल्ला जमिनदोस्त करून टाकण्याचें श्रेय एकट्या माधवराव बर्व्यांस मिळतें.

## ७–रत्नाकरपंताच्या स्वामिभक्तीचा व देशभक्तीचा निष्कामपणा.

पुढें रत्नाकरपंतांचें विनंतिपत्र येण्याविषयीं महाराजांस गेलें. वेढा उठला, ही आनंदाची बातमी पूर्वींच परभारें महाराजांस कळली होती. महाराजां-

नीं रत्नाकरपंतांची मोठी तारीफ केली, व किल्ले भुदरगडच्या सनदा चिटणीस यांजकडून लिहवून, शिक्का मोर्तब करून रत्नाकरपंतांच्या हातीं दिल्या. पण रत्नाकरपंतांची राजभक्ति त्यांच्यां देवभक्तीप्रमाणेंच निष्काम होती. " सर्व राज्यच सरकारानें स्वाधीन केलें आहे, सनदा कशास पाहिजेत " असें ह्मणून पुढें येऊन रत्नाकरपंतांनीं महाराजांच्या चरणांवर मस्तक ठेविलें, व जोतिबाच्या डोंगरास दर्शनास जाण्याविषयीं आज्ञा घेतली.

## ८–रत्नाकरपंतांची कुळदेवतेच्या ठिकाणीं ऐकान्तिक निष्ठा.

पुढें रत्नाकरपंत नमस्कार घालीत डोंगरास गेले, ते पांचवे दिवशीं डोंगरावर पोंहोचले. तेथें श्रीस अभिषेक करवून कंठी वगैरे कांहीं अलंकार दिले, व दहा हजार ब्राह्मणांची समाराधना घातली. कुळदेवतेवर निष्ठा असावी, तर अशी असावी. रत्नाकरपंतांचें कुळदैवत जोतिबा होय. जोतिबास रत्नाकरपंतानें नवस केला होता कीं जरवेढा उठला तर नमस्कार घालीत येईन. त्यामुळें वेढा उठल्या नंतर, वाखाणणी करण्यासारख्या मोठ्या लीनतेनें नमस्कार घालीत जाऊन रत्नाकरपंतानें आपला नवस फेडला. ज्यांत स्वार्थ यत्किंचित्‌ही नाहीं, अशा प्रकारची लीनतेसाहित ऐकांतिक निष्ठा कुळदेवतेच्या पायीं असल्याशिवाय मोठीं व स्तुत्य कामें पुरुपाच्या हातून होत नाहींत.

## ९–रत्नाकरपंतांचा मनाचा थोरपणा व लष्करी हुशारी.

जसे या वेळचे कोल्हापुरचे महाराज मनाचे थोर होते, तसेच त्यांचे कारभारी रत्नाकरपंत हेही होते. पूर्वीं अळत्याच्या लढाईत रामचंद्रपंत हातीं लागले, तेव्हां त्यांच्या जखमा नीट होतपर्यंत त्यांस ठेवून घेऊन, त्यांचा परामर्श महाराज व कारभारी या दोहों-नींही इतका उत्तम प्रकारें घेतला कीं रामचंद्रपंतास स्वतःच्याच घरीं आपण आहों, असें वाटलें. कोल्हापुरचा वेढा उठल्यानंतर, कोल्हापुरकरांचा दीर्घ द्वेष करणारा सिधोजीराव निपाणकर नांवाचा एक अगदीं जवळचा नातलग व स्वतंत्र सरदार होता. त्यानें शिंद्याच्या नावाजलेल्या पलटणांस बरोबर घेऊन नेरळीच्या ठाण्यास वेढा दिला होता. पण ठाणें जेरीस आलें नाहीं, ह्मणून सिधोजीरावानें रत्नाकरपंतांस कुमकेस पाठवि-ण्यासाठीं महाराजांस विनंति केली. रत्नाकरपंतही थोर मनानें प्रभूनें आज्ञा करितांच फौज घेऊन गेले. "नेरळीस पोंचल्यावर सर्व ठाण्या सभोंवती फिरून, दर-वाजाजवळ येतांच रत्नाकरपंत पालखींतून उतरले; आणि पाय उतारा लोकांस घेऊन, दरवाजांत जिभे-नजीक एकदम मोर्चा कायम केला. तेव्हां पलटणां-च्या सरदारांनीं रत्नाकरपंतांची जमावर्दी व धारिष्ट पाहून तोंडांत बोटें घातली, व मोठी तारीफ केली. दरवाजांतील मोर्च्याच्या अडचणीमुळें ठाणें जेरीस आलें, आणि ठाण्यांतील लोक कौलानें उतरून गेले. तेव्हां ठाणें रत्नाकरपंतांनीं निपाणकराच्या स्वाधीन केलें.

नंतर पलटणाच्या सर्व सरदारांनीं भेटीस येतों, ह्मणून सांगून पाठविलें. त्यावरून त्यांनींही तयारी करून येण्याविषयीं सूचना पाठविली. त्याप्रमाणें ते येऊन भेटले. क्षणभर बसून परस्पर बोलणीं झालीं. नंतर पानसुपारी, अत्तर गुलाब वगैरे देऊन, निरोप दिला." दुसरे दिवशीं निपाणकराचा निरोप घेऊन रत्नाकरपंत फौजेसुद्धां करवीरास गेले. विनंती केल्यामुळें आपल्या दीर्घद्वेषी शत्रूसही महाराजांनीं मदत करावी व रत्नाकरपंतांनीं आड येऊं नये, हा दोहोंचाही मनाचा थोरपणा खरोखरी वाखाणण्यासारखा होय.

## १०–रत्नाकरपंतांचा उतार वयांत कुळदेवतेच्या संनिध वास व त्यांच्या इतिवृत्तावरून कांहीं तुरळक विचार.

या काळापुढेंहीं रत्नाकरपंतांनीं दुसरीं, मर्दुमकीचीं कामें केलीं; व अखेरीस वृद्धापकाळ झाला असें पाहून, महाराजांची आज्ञा घेऊन, आपल्या कुळदेवतेच्या संनिध रहाण्यास गेले. तरी अडचणीच्या प्रसंगीं महाराज रत्नाकरपंतांचीच मसलत घेत; व जेव्हां महाराज मरायास टेंकले, तेव्हां पुढें करावयाची सर्व व्यवस्था त्यांनीं रत्नाकरपंतांसच सांगितली.

रत्नाकरपंतांसारखे पुरुष आपल्या लोकांमध्यें पूर्वी होऊन गेले, ह्मणून आपल्या लोकांचा उत्कर्ष चालला होता. हल्लीं इंग्रज सरकारच्या राज्यांत रत्नाकरपंतांसारखे पुरुष थोडे बहुत आहेत, ह्मणून इंग्रज सरकारच्या राज्यास बरीच आबादानी आहे. असले पुरुष ज्या लोकांमध्यें अधिक जन्मतात, त्या लोकांची उन्नति लौकर

होते. ज्या लोकांमध्यें असल्या पुरुषांची चहा नाहीं, त्या लोकांची उन्नति होणें नाहीं. ज्या राज्यामध्यें असल्या पुरुषांस मान मिळत नाहीं, तें राज्य लौकरच रसातळास जायाचें. सारांश, रत्नाकरपंतांसारखे पुरुष राज्याचे मोठे मजबूत खांब होत.

---

# २-अहल्याबाई होळकरीण.

## तात्पर्य.

१—होळकराची जात व मूळठिकाण. २—मल्हारराव होळकराची अतिसंक्षिप्त हकीकत. ३—अहल्याबाई सासऱ्याची आज्ञा पाळते. ४—मल्हाररावाचा आपल्या सुनेवर भरंवसा व सुनेचें त्या भरंवशास अनुरूप असें आचरण. ५—मल्हाररावाच्या पश्चात् अहिल्याबाईचा क्रम. ६—आहिल्याबाईचा वीरश्री व समयसूचकता. ७—तुकोजी येतो व लष्कर घेऊन शिप्रेवर जातो ८—राघोबा दादांची वीरश्री गार पडते व ते कांहीं दिवस अहिल्याबाईचे पाहुणे होतात. ९—अहिल्याबाईची शिस्त किती कडक होती त्याचें एक ध्यानांत ठेवण्यासारखें उदाहरण. १०—अहल्याबाईचे कांहीं विशेष ध्यानांत ठेविण्यासारखे लोकोत्तर गुण.

### १—होळकराची जात व मूळ ठिकाण.

होळकराचें घराणें जातीचें धनगर होय. खंडोबाचीं जितकीं महास्थानें आहेत, तितक्यांतून पूजा धनगराची असते. जशी शिवलिंगास पूजा गुरवाची असते, देवीस भोप्याची असते व भैरवास

डवऱ्याची असते, तशी खंडोबास धनगराची असते. गुरव, भोपे, डवरे व धनगर हे महाराष्ट्र मंडळांतील अस्सल क्षत्रियांपैकीं होत.

खंडोबाचें एक पुष्काळ प्रसिद्ध महास्थान जेजुरी मुक्कामीं आहे. या महास्थाना नजीक नीरा नदीचे कांठीं होळ नांवाचें गांव आहे. या गांवचा मूळपुरुष असल्यामुळें होळकर हें नांव एका घराण्यास मिळालें. या घराण्याची हल्लींची राजधानी इंदूर होय.

## २–मल्हारराव होळकराची अतिसंक्षिप्त हकीकत.

होळकराच्या घराण्याचा मूळपुरुष मल्हारराव होळकर हा पूर्वीं पेंढाऱ्यांच्या पतकांत असून, पांच पंचवीस घोडे बाळगून होता. पण याच्या तैनातीस कांहीं नसून, लुटींत यास व याच्या स्वारांपैकीं त्यास जें सांपडेल तें त्यानें घेऊन रहावें अशा करारानें बाळाजी विश्वनाथानें पेंढाऱ्यांच्या पतकांत यास पहिल्यानें ठेविलें. पेंढाऱ्यांचीं पतकें पेशव्यांनीं पहिल्यानें ठेविलीं, तीं याच प्रकारचा करार करून ठेविलीं. पुढें मल्हाररावानें गोतमाबाई नांवाची आपल्या मामाची मुलगी होती, तिच्याशीं लग्न लाविलें.

उदाजी पवार ह्मणून एक तलवारबहादुर मऱ्हाठा होता. उदाजीचें व पहिल्या बाजीरावाचें कांहीं कारणांनीं वांकडें आलें. बाजीरावानें मल्हाररावास आपल्या बाजूस ओढिलें, व उदाजीची मस्ती मोडिली. तेव्हां पासून मल्हाररावाचें प्रस्थ दिवसें दिवस वाढूं लागलें.

## ३–अहल्याबाई सासऱ्याची आज्ञा पाळते.

मल्हाररावाचा एकुलता एक मुलगा खंडेराव होता,

तो कुंभेरीच्या वेढ्यांत पडला. तेव्हांपासून मल्हारराव बराच उदास झाला. आपली सून अहल्याबाई सहगमन करणार हें ऐकून " बाई, तूं माझे पाठीवर आहेस, तर अहल्या मेली, खंडू आहे, हा मला भरंवसा " असा उद्गार काढिला. त्यामुळें अहल्याबाईनें सती जाण्याचा बेत रहित केला.

## ४–मल्हाररावाचा आपल्या सुनेवर भरंवसा व सुनेचें त्या भरंवशास अनुरूप असें आचरण.

मल्हाररावाचा अहल्याबाईवर पूर्ण लोभ व भरंवसा होता. खंडेराव पडल्यानंतर मुलुखी व्यवस्था मल्हाररावानें सगळी अहल्याबाईवर टाकली. अहल्याबाईस एक मुलगा होता, त्याचें नांव मालेराव; व एक मुलगी होती, तिचें नांव मुक्ताबाई. मल्हाररावाचा अहल्याबाईवर " पूर्ण लोभ. कशीही तबियत हेज्याह असल्यास, अहल्याबाईचा निरोप गेला असतां, त्याप्रमाणें व्हायाचें. दौलतींत उत्पन्नाविषयीं मल्हाररावाचें प्रारब्ध व पराक्रम. परंतु व्यवस्था करणें, नफानुकसानी पाहणें, हें कारभारी यानें अहल्याबाईच्या आज्ञेनें करीत असावें. आदिपश्चात् विचाराच्या गोष्टी बोलून मल्हाररावाचें मन वळविण्याजोगें पुण्य अहल्याबाईखेरीज दुसरें कोणाचें नव्हतें. अहल्याबाईचा धर्माचा लौकिक. पण वसुलाचे रुपयांपैकीं धर्माकडे एक कवडी न खर्चितां तिसरे वर्षीं किंवा चवथे वर्षीं हिशेब मामलेदारापेक्षां जुजरशीनें मल्हाररावाची बैठक वाफगांवीं असे, तेथें पाठवून द्यावे; व आपण

रेवातीरीं वास करून, स्नानसंध्या व दानधर्म यांत निमग्न रहावें. "

### ५–मल्हाररावाच्या पश्चात् अहल्याबाईचा क्रम.

मल्हारराव वारल्या नंतर त्याच्या मुलखाचें सगळेंच सूत्र अहिल्याबाईचे हातीं आलें. लौकरच तिचा मुलगा मालेराव हाही वारला. तरी अहल्याबाईनें आपल्या पूर्वीच्या क्रमांत कांहीं उणें पडूं दिलें नाहीं. पण पूर्वी पेक्षां धर्माकडेस आतां अधिक लक्ष देण्याचा व तुकोजी नांवाचा गोत्रज होता त्याच्यावर वराच कारभार सोंपविण्याचा निश्चय अहल्याबाईनें केला. पण इतक्यांत एक अतर्कित गोष्ट घडून आली.

### ६–अहिल्याबाईची वीरश्री व समयसूचकता.

गंगाधर यशवंत नांवाचा ब्राह्मण मल्हाररावाचे पदरीं पुष्कळ दिवसांपासून होता. त्यानें मल्हाररावाच्या पाठीं फारच अयोग्य वर्तणूक केली. होळकराचा मुलुख खालसा करून पेशवाईस जोडला जावा, या मतलबानें राघोबा दादास गंगाधरपंतानें पत्र लिहिलें. ही गुणगुण हरकुबाई व उदाबाई नांवाच्या मल्हाररावाच्या दोन मुली होत्या, त्यांच्या कानीं पहिल्यानें आली. त्या लागल्याच अहल्याबाईस भेटल्या व बोलल्या कीं "ब्राह्मण हरामखोरीस आला आहे. सावध न जाहल्यास तुह्माआह्मांस पुढें दाणे भरडावे लागतील." तेव्हां अहल्याबाईनें शिवबा बाजी व राजाराम आत्याजी नांवाचे दोघे पदरीं होते, त्यांस बोलावून आणण्यास सांगितलें. ते येतांच अहल्याबाईनें "धनीपणाचे जरबेनें भापण केलें. 'मेल्या ब्राह्मणानें हरामखोरी

आरंभिली आहे, परंतु मी बायको असें मानूं नका. खांद्यावर बांसडा टाकून उभी राहीन, तेव्हां श्रीमंतांचे दौलतीस अवघड पडेल. आमचे वडिलांनीं भाडभवई करून दौलत मिळविली नाहीं. तर तरवारीचे अनुमानें शरीर खर्ची घातलें आहे. आह्मी शिलेदार. वडिलांचे चाकरीप्रमाणें चाकरी घेतल्यास हजर आहों. धुणीपाणी सरली असल्यास मोंगलाईची चाकरी करूं अथवा फिरंग्याची करूं. अगर पाहिजे तें करूं. ब्राह्मण ह्मणतील, दौलतीचा अभिलाष करूं, हें होणार नाहीं.' हें बोलणें चौघांनीं-ऐकावें, अशा तऱ्हेनें बोलून, खुणा कानांत सांगितल्या कीं 'भोंसले, गायकवाड, दाभाडे वगैरे मऱ्हाठेमंडळ यांजला गुप्त पत्रें लिहून सांडणी स्वार विदा करावे व सांडणीची डाक बसवून तुकोजी होळकर यास सहावे दिवशीं मजपाशीं आणावें. हीं दोन्हीं कामें आज करावीं. मंत्रभेद न होण्याविषयीं फार जपावें.' इतकीं अक्षरें श्रवण करून उभयतां बाहेर आले."

या अहल्याबाईच्या भाषणावरून तिच्यामध्यें वीरश्री व समयसूचकता हे दोन गुण किती भरले होते, त्याचें सहज अनुमान करितां येतें. अशा प्रकारें आपल्या अनेक प्रसंगीं उपयोगीं पडलेल्या देशबंधूंची दौलत विनाकारण समूळ बुडविण्यासाठीं यत्न करून स्वतःच्याच मंडळामध्यें फूट पाडणें, याच्या सारखें परिणामीं घातक काम दुसरें नाहीं. अशा रीतीनें प्रभूनेंच जर आपल्या इमानी व शूर नोकरांस बुडविण्यास यत्न केला, व त्यामुळें मन विटून जर तो इमानी व शूर

नोकर दुसऱ्याच्या पदरीं जाऊन राहिला, तर त्यास कोणीही विवेकी पुरुष दोष देणार नाहीं.

### ७–तुकोजी येतो व लष्कर घेऊन शिप्रेवर जातो.

तुकोजी होळकर उदेपुरास होता, तो "सहावे रोजीं तृतीय प्रहरीं येऊन दाखल झाला. तेच क्षणीं, अभ्यंग स्नान घालून मुहूर्त अथवा कोणास विचारणें कांहीं एक न करितां, तुकोजीस डेरे उभे करून त्यांत दाखल केलें. त्याच दिवशीं हजार स्वार हुजरात व पंधराशें सरंजामापैकीं, पांचशें बाणांची कैची, सातशें जंबूरियाचे उंट इतकी जमियत प्रहर रात्रीचे आंत दाखल केली." भोसल्याची फौज हुसंगाबादेस छावणी करून होती, तिच्या कडूनही सांडणी स्वार आला. ".गायकवाडाकडून वीस हजार फौज आली. वरकड सरदाराचे जाब आले कीं 'मल्हारराव होळकराचा उपकार नाहीं असा कोण आहे? प्रसंगास आपले जवळच समजावें." राघोबा दादानें होळकरास बुडवायाचें मनांत आणिलें खरें. पण माधवराव पेशवे मोठे दूरदृष्टि व न्यायी होते. त्यांस हें राघोबाचें करणें रूचलें नाहीं, व "तुमचे दौलतीविषयीं जो पापबुद्धि ठेवील, त्याचें पारिपत्य वेलाशक करावें, व तुह्मांकडील दोन मुखत्यार हुजुर पाठवावे" असें त्यांचें पत्र येऊन धडकलें.

गंगाधर यशवंत व राघोबा दादा असे दोघे पन्नास हजार फौज घेऊन आले, व शिप्रेच्या ऐल तीरीं तंबू मारून राहिले. "दुसरे दिवशीं दादा ,साहेबांकडील फौजेची बिनी शिप्रेंत आली. पैल तीरीं दादा-

साहेबांची फौज आली हें समजतांच, अहल्याबाईचे पायांवर डोकी ठेवून तुकोजी निघाला. विनी शिप्रेंत आली, हें कळतांच तुकोजीनें सांडणी स्वार पाठविला कीं 'शिप्रा उतरलां असतां तुमची आमची तरवार चालेल. याचा विचार करून पाऊल टाकणें" तेव्हां दादा साहेबांकडेस आलेल्या सांडणी स्वारास पाठवून विनीवाले आपण तसेच उभे राहिले.

## ८-राघोबा दादाची वीरश्री गार पडते व ते कांहीं दिवस अहल्याबाईचे पाहुणे होतात.

अशी अहल्याबाईनें केलेली कडेकोट तयारी पाहून वीरश्री बरीच गार पडली, व दादासाहेबांनीं तुकोजीस भेटण्याची इच्छा दर्शविली. पण तुकोजीस दग्याची शंका आली, व तो येत नाहीं असें पाहून राघोबा दादा दहा पांच सरदार बरोबर घेऊन पालखींत बसले; व निघाले, ते तुकोजीकडेस दाखल झाले. पुढें तुकोजीनें दादासाहेबांस इंदुरीं नेलें. दादासाहेब एक महिनाभर अहल्याबाईच्या बंगल्याजवळ डेरा देउन राहिले. अहल्याबाई ही कांहीं साधारण बायको नव्हती. "मल्हाररावानें पैसा उत्पन्न करून मागें टाकावा, त्याची व्यवस्था व चार माणसांचें संरक्षण अहल्याबाईनें करावें, असा ओघ चालत आला होता. येणेंकरून अहल्याबाईचे तेजापुढें दादासाहेबांचे वर्चस्व कांहीं एक दिसण्यांत आलें नाहीं." महिनाभर राहून, अखेरीस दादासाहेब जसे आले तसे परत गेले. दादासाहेब गेल्यानंतर आलेल्या बड्या लोकांस अहल्याबाईनें मेजवानी दिली; व "तुह्मीं उपकार केल्यानें

आमचा सर्वोपरी बचाव झाला " असें ह्मणून प्रत्येकास गौरविलें.

## ९–अहल्याबाईची शिस्त किती कडक होती त्याचें एक ध्यानांत ठेविण्यासारखें उदाहरण.

पुढें अहल्याबाईनें शिवबा बाजी नांवाचा खाजगीकडे कारकून होता, त्याच्या हाताखालीं नारोपंत नांवाचा कारकून होता, त्यास आपली दिवाणगिरी सांगितली. कांहीं दिवसांनीं तुकोजीबरोबर नारोपंतास व शिवबास पुण्यास पाठविलें. तेंव्हां शिवबाची हुशारी पाहून माधवराव पेशव्यांचा त्याच्यावर लोभ बसला, व त्यास आपल्या पदरीं रहातोस काय ह्मणून श्रीमंतांनीं विचारिलें. नारोपंत हा मुळचा शिवबाच्या हाताखालचा कारकून असल्यामुळें, शिवबा होळकरशाहींत असेपर्यंत पावलो पावलीं नारोपंतास अडचणी येण्याचा संभव होता. असा विचारानें शिवबानें परवानगी मागितली ती तुकोजीनें दिली, व शिवबा श्रीमंतांचे पदरीं राहिला.

पदरच्यानें कोणीही आज्ञाभंग केला कीं अहल्याबाईच्या आंगाचा तिळपापड होई, व पायांची आग मस्तकीं जाई. पदरच्यास आज्ञाभंग प्रभूनें करूं दिला ह्मणजे प्रभूची अवज्ञा होण्यास आरंभ होतो. प्रभूची अवज्ञा होऊं लागली, ह्मणजे सर्वत्र अव्यवस्था माजते व दौलत लौकरच बुडते. आज्ञाभंग करणें व प्रसंगीं आज्ञा न मागणें, या दोहोंची मातब्बरी सारखीच होय. प्रभूस मसलत देऊन जर ती पसंत पडली, तर प्रभूची आज्ञा घेऊन तीप्रमाणें व्यवस्था

करणें, हा पदरच्याचा कालत्रयींही अनतिक्रमणीय असा मुख्य धर्म होय. तुकोजी व नारोपंत या दोघांनींही अहल्याबाईची आज्ञा आणिल्याशिवाय तिच्याच पदरच्या शिवबा वाजीची सदर्हु लिहिलेली व्यवस्था केली, ही एक मोठीच चूक उभयतांच्या हातून घडली. अहल्याबाईची परवानगी घेतल्याशिवाय श्रीमंतांची नोकरी पत्करली, हीही शिवबा वाजीनें एक मोठी चूक केली.

पुण्याहून नारोपंत इंदुरीं आले, तेव्हां अहल्याबाईनें लागलाच त्यांस पुष्कळ दोष लाविला. कांहीं दिवसांनीं तुकोजीही इंदुर मुक्कामीं आला व अहल्याबाईस भेटला. तेव्हां अहल्याबाई ह्मणाली कीं "दौलत आपल्या हातें दुसऱ्याचे घरांत घातली, तरी कारभारी आपला कारकून केला कीं पांच विसवे तरी त्याचें मन मजकडे ओढेल. त्यानें वस्त्रें घेतांच चांचणूक दाखविली. तेव्हां दौलतीचा आमचा संबंध राहिला नाहीं. ईश्वरानें सोडविलेंच आहे. तत्पक्षीं महेश्वर नर्मदातटाकीं पुण्य क्षेत्र आहे तेथें स्नानसंध्या करावी, हा आमुचा मनोधर्म. दौलत तुमचे स्वाधीन केली आहे. वडिलांचा लौकिक संरक्षण करून यजमान श्रीमंत यांच्या लोभाचा ओघ शुष्क न पडे, यास जपावें. आमचा परामर्श कराल न कराल, याचें चिन्ह दिसतच आहे." असे अहल्याबाईनें उद्गार काढिले, तेव्हां कांपरें सुटून तुकोजीनें आपल्या मुसकुटांत मारून घेतली व उत्तर केलें कीं " सुभेदार असतां भाऊबंदकी एकीकडे ठेऊन, गुलामजादा या

वृत्तीनें हुकूम बजावीत आलों. त्यांचे कूर्मदृष्टीचें हें फळ. सुभेदारही हरएक विषयीं आपले भरंवशावर निश्चित होते. प्रसंगीं सुभेदारांचे आशिर्वादाचा अनुषंग पाहून मजला माणूस केलें. तेव्हां माझे सुभेदार व मातोश्री प्रत्यक्ष आपणच आहांत. साक्षात् आपला मार्तंड येऊन बोलला असतां आपले पायांशीं अंतर होणार नाहीं, मग प्राण जावो कीं राहो." हें भाषण ऐकून, असला प्रकार पुनः न होऊं देण्याविषयीं निःसंशय तुकोजी जपेल, अशी अहल्याबाईच्या मनाची खात्री झाली. "तरी बोलण्यांत अर्थ नाहीं, दिसण्यांत येईल तें खरें; बोलण्याप्रमाणें चालणें झालें असतां, ईश्वर उपेक्षा करीत नाहीं" असा अर्थभरित उद्गार अहल्याबाईच्या तोंडून निघाला. नारोपंतास कारभारावरून तुकोजीनें लागलेंच दूर केलें. पुढें अहल्याबाईच्या अनुरोधानें सर्व व्यवस्था लावून, दिल्लींत मोठी घडामोड चालली होती तिकडेस तुकोजी वळला. सारांश, अहल्याबाईची शिस्त शिवाजी महाराजांचे शिस्तीप्रमाणें कडक होती. अशा प्रकारची शिस्त असेल, तरच दरोबस्त लहान मोठ्या कामगारांस प्रभूचा वचक राहून मुलखांत बंदोबस्त उत्तम रहातो.

## १०—अहल्याबाईचे विशेष ध्यानांत ठेवण्यासारखे कांहीं लोकोत्तर गुण.

अहल्याबाईस नवऱ्यापासून फारसें सुख झालेलें नाहीं. मालेराव एकुलता एक मुलगा होता, तोही लहानपणींच वारला. एकुलती एक मुलगी मुक्ताबाई नवऱ्याबरोबर सती गेली. अशा प्रकारें दुःखाचे डोंगर

एका मागून एक वर कोसळले, तरी अहल्याबाई यत्किंचित्‌ही डगमगली नाहीं. "आलिया भोगासी असावें सादर। देवावरी भार घालूनीयां" या तुकोबांनीं सरस वर्णन केलेल्या एका सुरेख महासिद्धान्ताचें पूर्ण-पणें अनुसरण करून "जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टवीती नानापरी" हें तुकोबांचेंच महावाक्य अर्थानें किती ओतप्रोत भरलेलें आहे, तें उदाहरणानें नीट स्पष्ट करून दाखविल्याबद्दल प्रत्येक महाराष्ट्रानें अहल्याबाईचे मोठे व कधींही अविस्मरणीय असे उपकार मानिले पाहिजेत. सासऱ्याची सेवा जशी अहिल्याबाईनें मनापासून केली, तशी बऱ्याच कडक स्वभावाच्या सासूचीही सेवा मनापासून केली; व जसे सासऱ्याचे तसेच सासूचेही आशीर्वाद तिनें घेतले. राज्याचा कारभार करून जो वेळ सांपडे, तो पुराण श्रवण करण्यांत व देवाचें चिंतन करण्यांत अहल्याबाई घालवी. जितकीं ह्मणून पुण्यक्षेत्रें आहेत, तितक्यांमध्यें घाट बांधल्यामुळें व अन्नसत्रें घातल्यामुळें किंवा दुसऱ्या कोणत्या तरी प्रकारानें अठरापगड जातींच्या यात्रेकरूंचें व गोरगरीबांचें कल्याण केल्यामुळें सर्वांचेही एकसारखे आशीर्वाद अहल्याबाईस आजपर्यंत मिळाले आहेत.

याप्रमाणें अहल्याबाईचें नांव हिंदुस्थानभर अजरामर झालेलें आहे. यावचंद्रदिवाकर या साध्वीच्या नांवाचा लोप होणें केवळ अशक्य होय. अहल्याबाई वायकोच्या जन्मास येऊन जशी उभय कुळांची दीपक झाली. तशी लोकदीपक व देशदीपकही झाली.

प्रत्येक महाराष्ट्रास अहल्याबाईचा मोठा अभिमान वाटतो, त्यांत नवल नाहीं. शिवादिन केसरीनें "प्रपंच साधुनि परमार्थाचा लाहो ज्यानें केला। तो नर भला भला भला" असें एका पदांत ह्मटलें आहे, तें अहल्याबाईस नीट लागू होतें.

# ३-सिधोजीराव देसाई
## (निपाणकर.)

१—सिधोजीचा व कोल्हापुरकरांचा संबंध. २—सिधोजी प्रतिज्ञा करून कोल्हापुर सोडतो. ३—सिधोजी दोनदा पळून जातो. ४—पेशव्यांची व इंग्रजांची कामगिरी बजाविल्यामुळें सिधोजीचें प्रस्थ वाढतें. ५—सावगांवची लढाई मारून सिधोजी आपली प्रतिज्ञा पूर्ण करितो.

### १-सिधोजीचा व कोल्हापुरकरांचा संबंध.

पूर्वींच्या काळीं महाभारतांत भीष्मानें दोनदा प्रतिज्ञा केली. सत्यवती नांवाची एक कोळ्याची मुलगी होती. सत्यवतीस पराशर नांवाच्या ऋषीपासून एक मुलगा झाला होता, तो द्वैपायन किंवा वेदव्यास या नांवानें पुढें नांवाजला. पुढें ही सत्यवती एकदा भीष्माचा बाप राजा शंतनु याच्या दृष्टीस पडली. शंतनूचें मन लागलेंच तिच्यावर बसलें, व कोळ्यानें तीस आपल्या पदरीं बांधावें ह्मणून शंतनूनें यत्न चालविला. पण शंतनूस कोळी सत्यवती देईना, कारण सत्यवतीस मुलगा झाल्यास त्या मुलाचा गादीवर हक्क

पोंचत नव्हता. भीष्म हा ज्या पक्षीं शंतनूच्या पहिल्या बायकोचा मुलगा पडला, त्या पक्षीं तो व त्यास होणारे मुलगे गादीचे वारस होते. मुलास गादीवरचा हक्क सोडूं सांगण्याची शंतनूची छाती होईना, व त्यामुळें तो झुरणीस लागला. जेव्हां बाप झुरणीस लागण्याचें कारण पूर्णपणें समजलें, तेव्हां भीष्मानें आपला गादीवरचा हक्क लागलाच सोडला. इतकेंच नाहीं, तर लग्न केल्यास पुढें कदाचित् मुलगा होऊन तो आपल्या पूर्वजांच्या गादीवर हक्क सांगूं लागेल, तें तसें न घडावें ह्मणून यावज्जीव ब्रह्मचारी रहाण्याची दारुण प्रतिज्ञा भीष्मानें केली व जसा कोळ्याचा तसाच आपल्या बापाचा मनोरथ पूर्ण केला.

पुढें कौरवांचा व पांडवांचा अठरा दिवस जो तुंबळ विग्रह जुंपला होता, त्यांत भीष्म कौरवांच्या बाजूस होता. हा विग्रह संपेपर्यंत हातीं शस्त्र न धरिण्याचा दृढ निश्चय कृष्णानें केला होता. पण हा निश्चय मोडून टाकीन तरच नांवाचा भीष्म, अशी सर्वांच्या समक्ष अतिदुष्कर प्रतिज्ञा भीष्मानें केली. पूर्वीची प्रतिज्ञा निवृत्तिरूपी पडली. पण जशी ती पूर्ण केली, तशीच ही प्रवृत्तिरूपी अतिदारुण प्रतिज्ञाही भीष्मानें पूर्ण केली. अर्जुनाचें रक्षण करण्यासाठीं कृष्णास सुदर्शन हातीं धरावें लागलें; व आपली प्रतिज्ञा पूर्ण झाली, असें पाहून भीष्मानें हातांतलें आपलें धनुष्य लागलेंच जमिनीवर टाकलें.

जशी पूर्वीच्या काळीं प्रवृत्तिरूपी प्रतिज्ञा करून ती भीष्मानें आपल्या आंगच्या बळावर पूर्ण केली,

तशीच सिधोजीराव देसाई यानेंही आपल्या महाराष्ट्र-मंडळाच्या ऐतिहासिक काळीं एक प्रवृत्तिरूपी प्रतिज्ञा करून ती अनेक संकटें आलीं असतांही अखेरीस आपल्या बाहूंच्या बळावर पूर्ण केली.

कोल्हापुरचे छत्रपति शिवाजी महाराज यांचें कुटुंब व सिधोजीची आई या सख्या बहिणी होत. असें महाराजाचें नातें होतें ह्मणून सिधोजी लहानपणापासून कोल्हापुरींच राहूं लागला व महाराजांनींही त्याचें पोटच्या लेंकरा प्रमाणें पालन केलें.

## २–सिधोजीची प्रतिज्ञा.

गजेंद्रगडकर नांवाचा एक सरदार होता, त्याच्या मुलीचें लग्न सिधोजीबरोबर ठरलें होतें. पण पुढें महाराजांच्याच अनुमतानें त्या मुलीचें लग्न हिंमतराव चव्हाण ह्मणून दुसरा सरदार होता, त्याच्याबरोबर झालें. तेव्हां "राजकन्येशीं लग्न करीन तरच नांवाचा सिधोजी होईन" अशी प्रतिज्ञा करून सिधोजीनें कोल्हापुर सोडलें. सिधोजी कोल्हापुर सोडून गेला, तो पटवर्धनांच्या पदरीं राहिला. कोल्हापुरकरांचा व पेशव्यांचा पुष्कळ दिवसांपासून द्वेष होता. कोल्हापुरकरांस वर डोकें न करूं देण्याच्या उद्देशानें कोल्हापुरकरांच्याच प्रांतास लागून पेशव्यांनीं पटवर्धनांस मोठी जहागीर दिली होती. या काळीं पटवर्धनांच्या घराण्यांत मुख्य पुरुष परशुराम भाऊ होता. परशुराम भाऊनें आपल्या फौजेंत सिधोजीस सरदारकी दिली.

## ३–सिधोजी दोनदा पळून जातो.

पट्टणकुडीजवळ जी परशुराम भाऊची व कोल्हापुरकरांची मोठी अरेतुरेची लढाई झाली, तींत सिधोजी हजर होता. पण या लढाईत परशुराम भाऊ पडले, व पटवर्धनांच्या फौजेबरोबर सिधोजीही पळाला. पुढें पेशव्यांचे दरबारीं सिधोजी गेला, व परशुराम भाऊचा मुलगा रामचंद्रपंत याच्याबरोबर शिंद्याचीं गोऱ्या सरदारांच्या हाताखालचीं पलटणें घेऊन पुनः कोल्हापुरकरांबरोबर लढाई करण्यास आला. कोल्हापुरास शिंद्याच्या नांवाजलेल्या पलटणाचा वेढा पडला, व कोल्हापुर बुडतें, असें भासूं लागलें. या वेळीं रत्नाकरपंत नांवाचा एक पराक्रमी पुरुष—ज्याचें संक्षिप्त चरित्र आरंभींच सादर केलें आहे तो—कोल्हापुरकरांचा कारभारी होता, त्याचे हातीं सर्वानुमतें सर्व प्रकारचा फौजेचा बंदोबस्त दिलेला होता. या प्रसंगीं कोल्हापुरची अब्रू राखिली ती रत्नाकरपंतांनीं राखिली, व सिधोजीस पुनः एकदा पळून जावें लागलें.

## ४–पेशव्यांची व इंग्रजांची कामगिरी बजाविल्यामुळें सिधोजीचें प्रस्थ वाढतें.

या प्रमाणें कोल्हापुरकरांस नमविण्यासाठीं ह्मणून दोन यत्न केले ते फसले, तरी सिधोजी निराश झाला नाहीं. "प्रयत्नीं परमेश्वर" अशी एक आपल्या लोकांमध्यें ह्मण आहे. पुढें सिधोजी पेशव्यांचेच पदरीं राहिला. पटवर्धनांच्या मुलखावर हल्ला करून त्यांची जहागीर ओसाड करून टाकण्याची पेशव्यांनीं


सांगितलेली कामगिरी सिधोजीनें नीट बजाविली. पुढें धोंड्या वाघ नांवाचा पुंड होता, त्याच्या पाठीं इंग्रजांचा वेलेसली नांवाचा सरदार लागला होता, त्यास सिधोजीनें मदत केली. त्यामुळें वेलेसलीनें शिफारस करून "सरलष्कर" अशी पदवी पेशव्यांकडून सिधोजीस देवविली. तेव्हांपासून सिधोजीचें प्रस्थ वाढूं लागलें, व आरब वगैरे तुफानी लोक बरेच आपल्या पदरीं ठेवण्याचा क्रम सिधोजीनें चालविला.

## ९–सावगांवची लढाई मारून सिधोजी आपली प्रतिज्ञा पूर्ण करितो.

कांहीं दिवसांनीं आंगीं चांगलें बळ आलें असें पाहून सिधोजीनें पुनः कोल्हापुरकरांच्या प्रांतास उपद्रव करण्यास आरंभ केला, व कोल्हापुरकरांच्या सरदारांमध्येंही फितवाफितवी चालविली. सावगांवची लढाई झाली, तींत कोल्हापुरकरांचा पुरा मोड झाला; कारण कीं बरेच सरदार सिधोजीनें फितविले होते. तेव्हां महाराजांनीं तहाचें बोलणें चालविलें. पण सिधोजीनें राजकन्येबरोबर लग्न लागेल, तरच तह करण्यांत येईल, असें साफ सांगितलें. पुढें सर्वांच्या विचारानें येसूबाई नांवाची महाराजांची मुलगी उपवर होती, तिचें सिधोजीबरोबर मोठ्या थाटानें लग्न झालें. याप्रमाणें सिधोजीनें दिसण्यांत दुर्निवार अशी अनेक संकटें आलीं असतांही आपली प्रतिज्ञा पूर्ण केली; व प्रतिज्ञा पूर्ण करणारांच्या पटांत बरेंच वर आपलें नांव ढकललें.

इसवी सन १८३९ या वर्षी सिधोजी वारला. व

लागलेंच इंग्रज सरकारानें आपल्या वहिवाटीप्रमाणें निपाणी संस्थान खालसा केलें. संस्थानी परलोकवासी होतांच त्याचें संस्थान कोणती तरी सबब सांगून खालसा करण्याची अपूर्व वहिवाट घालून ती बरीच वर्षें जारीनें चालविल्यामुळें कंपनी सरकारचा मुलुख या काळीं ह्मणजे इसवी एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या पादांत पटापट विस्तारत गेला.



विक्रीस तयार.

**NAPOLEON'S BOOK OF FATE.**

# नेपोलियन बोनापार्ट

मराठी ] यांचें सर्व प्रसिद्ध [ भाषांतर.

# श्रीशकुनवंती पुस्तक.

किंमत २ आणे, टपालहांशील ६ पै.

**पत्ता**—वार्ताहर कचेरी, मार्केट पोस्ट, मुंबई.

---

| | | | |
|---|---|---|---|
| आगमप्रकाश.... .... .... | २ | ० | ० |
| वीरपत्नी ( रेनोल्डस् सोल्जर्स वाईफ ) | १ | ० | ० |
| वज्रेश्वरी, ( रेनोल्डस् सीम्सस्ट्रेस ) | ० | ८ | ० |
| गजराबाई किंवा हारिद्वार मल्लिका .... | ० | ४ | ० |
| गंगालहरी ( टीकेसहीत ).... .... | ० | ४ | ० |
| श्री पांडुरंगांच्या काकड व शेजारत्या, मौंजी, विवाह अष्टकें इ० .... | ० | ३ | ० |
| अग्निक्रीडाचमत्कार (दारु कांमाचें पुस्तक) | | २ | ० |
| आर्यनीतिसुधा ( भगवद्गीतेंतील वेंचें ) | ० | १ | ० |
| स्त्रीगीतमाला. भाग १. .... | ० | १ | ० |
| पंढरीचा विठोबा ( पद ).... .... | ० | १ | ० |
| साध्वी स्त्री .... .... .... | ० | ० | ६ |

वरील पुस्तकें मुंबईत '**फ्यामिली प्रिंटिंग प्रेस**' मध्यें विकत मिळतील. टपाल हंशीला-बद्दल रूपयास दोन आणे प्रमाणें जास्त पडेल. टिकीटा वर्तवळ्यासह पाठवाव्या. नॉट पेड पत्र घेतलें जाणार नाहीं. **पत्ता**—१४३ दादीशेट आगिआरी रस्ता.

# तारांगण.

प्रत्येक रविवारीं प्रातःकाळीं प्रसिद्ध होत असतें.

**(वर्षाची किंमत अवघे दोन रुपये.)**

या पत्रांत जगांतील निरनिराळ्या भागांवरच्या इ- लक्या बातम्या, स्वदेशांतील ताजीं व निवडक वर्तमा काळ्या गोऱ्यांचे होणारे सामने अर्थात् **जुलुमाच** गोष्टी, एखादा देशस्थितीच्या विषयावर थोडक्यांत च टकदार असा निबंध व एखाद्या संस्थानाची ऐतिहासि- क माहिती, ह्या सर्व गोष्टींचा यथावकाशें समावेश हो असतो. वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं आपलीं नां पत्त्यासह खालीं सही करणाराकडे. मुंबईत 'फ्यामिलि प्रिंटिंग प्रेस,' नं० १४३ दादीशेट अग्यारी रोडव. पाठवावीं. टपाल हंशील नाहीं.

**बाळाजी कृ० रघुनाथजी.**

---

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **मऱ्हाठ्यांच्या संबंधानें चार उद्गार** | १ | ४ | ० | ट. |
| **जशास तसें** | ० | ४ | ० | ,, |
| **,, पुरवणी** | ० | १ | ० | ,, |
| **विधवाविवाह सशास्त्र किं अशास्त्र?** | ० | १ | ० | ,, |
| **शिव छत्रपतीचें चरित्र** | ० | २ | ० | ,, |
| **रत्नाकरपंतआप्पा, अहल्याबाई होळकरीण व सिधोजी निपाणकर** | ० | १ | ६ | ,, |
| **शककालविचार** | ० | ६ | ० | ,, |